वर्ष-०८ | अंक-१८ | मुंबई, मंगळवार २२ ते २८ मार्च - २०२२ | पृष्ठ-४

पोलीस बातमी पत्र

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 चिंचवडमध्ये व्यवसायासाठी मदत मागत वृद्धाला 35 लाखांना लुटलं

3 → अंबरनाथमध्ये चोरी आणि घरफोडीच्या दोन गुन्ह्यांची उकल, चोरट्याला पोलिसांकडून बेड्या

स्वत:च्या शेतीवर राखणदारीला गेलेल्या शेतकऱ्याचा मृतदेह आढळला, भंडारा कलेवाडा शेतशिवारातील घटना ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## चहासाठी रसायनयुक्त गुळाचाच वापर ; दुकानदारांकडून ग्राहकांची फसवणूक



पुणे : शहरांमध्ये गुळाच्या चहाची दुकाने थाटली जात आहेत. साखरेच्या चहापेक्षा गुळाचा चहा आरोग्यासाठी चांगला म्हणून गुळाच्या चहाला लोकांची पसंती मिळत आहे. पण, वास्तव काही वेगळेच आहे.. राज्यात १०० टक्के सेंद्रिय गुळाचे उत्पादन एकूण उत्पादनाच्या तुलनेत एक टक्काही होत नाही. रसायनमुक्त गुळाचे प्रमाणही पाच टक्क्यांहून अधिक नाही. त्यामुळे चहासाठी वापरला जाणारा गूळ बहुतेक करून रासायनिकच असतो.

राज्यातील गूळ व्यवसाय संघटित नसल्यामुळे नेमके उत्पादन किती होते याची माहिती मिळत नाही. कोल्हापुरात दरवर्षी ३० किलोच्या साधारण १९ लाख ढेपा (रवे) तयार होतात. सेंद्रिय पद्धतीने उसाचे उत्पादन केले आणि त्यापासून सेंद्रिय पद्धतीने गूळ तयार केला तरच तो १०० टक्के सेंद्रिय गूळ असतो. अशा १०० टक्के सेंद्रिय गुळाचे उत्पादन एकूण गुळाच्या उत्पादनापैकी एक टक्काही होत नाही. रसायने न वापरता तयार केलेला गूळच सेंद्रिय म्हणून विकला जातो. या गुळाचे उत्पादनही पाच टक्क्यांहून अधिक नाही.

## मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात 1240 किलो प्लास्टिक वापर

### विरोधात सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत धडक कारवाई



मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त श्री. दिलीप ढोले यांच्या निर्देशानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाने प्लास्टिक वापर विरोधात दंडात्मक कारवाई करण्यास सुरूवात केली आहे. दिनांक 16 मार्च 2022 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्लास्टिक वापर विरोधात मोठी कारवाई करण्यात आली. उपायुक्त (सार्वजनिक आरोग्य) रवि पवार यांच्या उपस्थितीत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनी प्लास्टिक बॅग, आणि "सिंगल युज प्लास्टिक" विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करून जवळपास 1240 किलो प्लास्टिक जप्त करून एकूण रु. 25,000/- इतका दंड वसूल केला आहे. विशेष म्हणजे एकाच दुकानात 1200 kg प्लास्टिक जप्त करण्यात आले.महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग निर्णयानुसार आता महाराष्ट्र राज्यात एक वेळ वापरून फेकून देण्याच्या प्लास्टिक (single use plastic) वापरावर बंदी आहे. शहरातील भाजी विक्रेते, दुकानदार शहरात सर्रास प्लास्टिक बॅग चा वापर करताना दिसून येतात. त्याच प्रमाणे "युज अँड थ्रो" च्या डब्या, प्लेट्स, ग्लासेस, शोभेच्या माळा, थर्माकोल, इत्यादी वापराच्या वस्तू सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रक्रिया प्रकल्पावर मोठ्या प्रमाणात दररोज जमा होत आहेत. त्याठिकाणी मनुष्य बळ वापरून हे प्लास्टिक वेगळे करण्यात येत आहे.




त्यामुळे कामगारांच्या देखील आरोग्याचा आणि एकंदरीत या शहराच्या आरोग्याचा मोठा पर्यावरणीय प्रदूषणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. महानगरपालिका आयुक्त दिलीप ढोले यांच्या निर्देशानुसार व उपायुक्त (सार्व. आरोग्य) रवि पवार यांच्या उपस्थितीत लिपिक, मुकादम, फेरीवाला पथक कर्मचारी यांच्या उपस्थितीत शहरातील भाईंदर पूर्व येथील साईबाबा नगर या परिसरातील तर भाईंदर पश्चिमेकडील 4



दुकानांवर प्लास्टिक वापर विरोधात धडक कारवाई करण्यात आली. प्लास्टिक बॅग, आणि "सिंगल युज प्लास्टिक" विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करून जवळपास 1240 किलो प्लास्टिक जप्त करून रु. 25,000/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. त्याचबरोबर प्लास्टिकचा वापर करणारे विक्रेते व नागरिकांना पहिल्या वेळेस रु. 5000, दुसऱ्या वेळेस रु. 10,000 व तिसऱ्या वेळेस रु. 25,000 इतका दंड आकारून फौजदारी गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे असे उपायुक्त (सार्व. आरोग्य) रवि पवार यांनी सांगितले आहे. "सिंगल युज प्लास्टिक" च्या वापरावर महाराष्ट्र शासनमार्फत बंदी आहे तसेच यामुळे पर्यावरणाला देखील हानी पोहचत आहे म्हणूनच "सिंगल यूज प्लास्टिक" ची विक्री करणे तसेच वापर करणे शहरातील दुकानदार, फेरीवाले व नागरिकांनी टाळावे असे आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त श्री. दिलीप ढोले यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## मूल होत नसल्याने पत्नीचा खून ; कात्रज भागातील प्रकार; पती अटकेत



पुणे : मूल होत नसल्याने एकाने पत्नीचा गळा दाबून खून केल्याची घटना कात्रज भागात घडली. या प्रकरणी पतीस भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली.या प्रकरणी देवानंद मिच्छद काळेल (वय ३०, रा. वेताळनगर, आंबेगाव बुद्रुक) याला अटक करण्यात आली. काजल देवानंद काळेल (वय २४) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. काजलचे वडील मारूती बाड (रा. कोनगाव, जि. ठाणे) यांनी या संदर्भात भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

देवानंद मूळचा सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील रहिवासी आहे. त्याचा दोन वर्षांपूर्वी काजलशी विवाह झाला होता. विवाहानंतर मूल होत नसल्याने त्याने काजलचा छळ सुरू केला. दोन दिवसांपूर्वी रात्री दोघांची भांडणे झाली. त्याने पत्नीचा गळा आवळून खून केला. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली. देवानंदला अटक करण्यात आली असून त्याला न्यायालयाने पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

## अमरावतीत सकाळचं जेवण रात्री खाल्ल्याने 25 जणांना विषबाधा, चौघांची प्रकृती गंभीर

अमरावती : सध्या सर्वत्रच मोठ्या प्रमाणात सण, समारंभ आणि उत्सव सुरू आहे. अशातच अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यात अंतर्गत येणाऱ्या चमक येथील एका कार्यक्रमात सकाळचे जेवण (Dinner) रात्री खाल्ल्याने तब्बल 25 जणांना विषबाधा (Poisoning) झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेत 25 नागरिकांना विषबाधा झाली असून 4 जणांची प्रकृती गंभीर आहे. विषबाधा झालेल्या सर्व नागरिकांवर विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरु आहेत.

तेरवीच्या जेवणातून विषबाधा

अचलपूर तालुका अंतर्गत येणाऱ्या चमक येथे हरिभाऊ चरोडे यांच्या तेरवीचा कार्यक्रम होता. या कार्यक्रमाला पाहुण्यांसह पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित




होते. यातील काही पाहुण्यांनी दिवसाचे हेच अन्न रात्री खाल्ले. त्यांना त्रासदायक वाटले मात्र त्यांनी दुर्लक्ष केले. त्यामुळे अनेक जणांना ताप उलट्या व्हायला सुरुवात झाली. मात्र दिवसभर दुर्लक्ष केल्यानंतर अनेकांना त्रास वाढल्याने नागरिकांनी अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात धाव घेतली. यातील 25 जणांना विषबाधा झाली असून 4 जण हे गंभीर अवस्थेत असल्याची माहिती कळते.

निर्मला बुरंगे, प्रल्हादराव जाणे, गोपाळ चरोडे, शीला हरी चरोडे अशी गंभीर अवस्थेत असलेल्या चौघांची नावे आहेत. यातील अनेक नागरिक खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. उपजिल्हा रुग्णालयात दाखल झालेल्या रुग्णांवर डॉ. दीपक, मुख्य डॉक्टर प्रसन्नकुमार सुदाम, डॉ. दीपाली जाधव, डॉ. शैलेंद्र देवकर उपचार करत आहेत. अन्नातून झालेल्या विषबाधेनमुळे नागरिकांना हा त्रास होत असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

नंदुरबारमध्येही प्रसादातून विषबाधा झाल्याची घटना

नंदुरबार तालुक्यातील राकसवाडे गावात महाशिवरात्रीच्या प्रसादातून 125 लोकांना विषबाधा झाल्याची घटना घडली होती. प्रसाद खाल्ल्यानंतर विषबाधेमुळे अनेकांना उलट्या आणि काहींना जुलाबचा त्रास जाणवू लागला. मात्र उपचारानंतर सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर झाली. सर्व बाधितांवर राकसवाडे आरोग्य केंद्रातच उपचार सुरू करण्यात आले.

महाशिवरात्रि निमित्ताने ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन गावात करण्यात आले होते. मात्र महाप्रसाद वाटपानंतर काही ग्रामस्थांना सायंकाळी उलट्या होवू लागल्या. हळूहळू उलट्या होणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाल्याने नागरिकांनी प्राथमिक आरोग्य केंद्रात धाव घेतली. उलट्या होणाऱ्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याने प्रसादातून विषबाधा झाल्याचे आरोग्य केंद्रातील डॉक्टरांनी सांगितले.

## अहमदनगरमध्ये किरकोळ वादातून बंदुक रोखली, सहा जणांवर गुन्हा दाखल

अहमदनगर : किरकोळ कारणावरुन झालेल्या वादा त बंदुकी चा धाक दाखवल्याची धक्कादायक घटना अहमदनगरमधील पाथर्डी तालुक्यातील तोंडळी गावात घडली आहे. आमच्या शेतात जनावरे का बांधली अशी विचारणा केली असता शेजारील शेतकऱ्याने वडिलांची लायसन्सधारी बंदुक आणत दहशत पसरवली. विकास भिसे असे बंदुक दाखवून दहशत पसरविणाऱ्या आरोपीचे नाव आहे. सदर बंदुक विकासचे वडील रामकिसन भिसे यांच्या नावे आहे. याप्रकरणी सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जनावरे शेतात बांधल्याचा जाब विचारल्याने रोखली बंदुक

पाथर्डी तालुक्यातील तोंडळी गावात फिर्यादी किरण विश्वनाथ दरेकर आणि आरोपी राहतात. आरोपीची जनावरे दरेकर यांच्या शेतात बांधल्याने त्यांनी आरोपीला



जाब विचारला. जाब विचारल्याचा राग आल्याने आरोपी विकास भिसे याने वडिलांची लायसन्सधारी बंदुक आणून दरेकर यांच्यावर रोखली. तसेच तुम्हाला जिवंत ठार मारुन टाकेल अशी धमकी दिली. या घटनेमुळे काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. आरोपीने थेट बंदुक दाखवल्याने एकच खळबळ उडली. याप्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस करत आहेत.गावठी पिस्तूल घेऊन दहशत माजविणाऱ्या एकाला अटक जळगाव शहरातील मासूमवाडी येथील आठवडे बाजार परिसरात दोन गावठी पिस्तुल घेऊन फिरणाऱ्या तरुणाला एमआयडीसी पोलिसांनी अटक केली आहे.

## धक्कादायक! ठाण्यात लावणीसम्राज्ञी विजया पालव यांना विनयभंग करत मारहाण



प्रसिद्ध लावणी कलावंत आणि अभिनेत्री विजया पालव यांचा विनयभंग करून त्यांना मारहाण केल्याचा प्रकार रविवारी सायंकाळी उघडकीस आला आहे. इमारतीचा मालक चेतन पाटील याच्यासोबत झालेल्या वादातून हा प्रकार घडला आहे. याप्रकरणी चेतन पाटील याच्यासह त्याच्या कुटुंबियांविरोधात मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दवा येथील रेल्वे स्थानक परिसरातील एका इमारतीमध्ये विजया त्यांचे पती आणि मुलासोबत राहतात. रविवारी सायंकाळी त्यांच्या घरातील स्वच्छतागृहाच्या नळाची दुरूस्ती करायची होती. त्यामुळे त्यांनी एका नळ दुरूस्त करणाऱ्याला बोलावले होते. संबंधित नळ दुरूस्त करणारा त्याठिकाणी आला असता चेतन पाटील याने त्यास अडविले. याचा जाब विचारण्यासाठी विजया आल्या असता चेतन याने त्यांचा विनयभंग केला. त्यानंतर त्यांचे डोके भिंतीवर आपटले. तसंच चेतनची पत्नी, आई, भाऊ आणि इतर दोघांनी त्यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली. रात्री उशिरा विजया यांनी उपचार केल्यानंतर याप्रकरणी तक्रार दाखल केली. त्यानुसार सोमवारी पहाटे याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कोरोनामुळे पालक गमावलेल्या जिल्ह्यातील बालकांना कायदेविषयक सहाय्यासाठी २३ मार्च रोजी लोकअदालत

ठाणे, कोरोनामुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना कायदेविषयक सहाय्यासाठी २३ मार्च रोजी लोकअदालत घेण्यात येणार असल्याचे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी महेंद्र गायकवाड यांनी सांगितले. जिल्हा कृती दल आणि जिल्हा विधी व न्याय सेवा प्राधीकरणाच्या माध्यमातून या लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी जिल्ह्यातील ४४ बालकांना त्यांचा वारसा हक्क मिळवून देणे, वडिलोपार्जीत घर, शेती त्यांच्या नावावर करून देणे आदी बाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.कोरोनामुळे आई-



वडिलांचे छत्र गमावलेल्या बालकांची संख्या ठाणे जिल्ह्यात ४४ असून केंद्र व राज्य शासनामार्फत त्यांच्या शिक्षणाची आणि भवितव्याची जबाबदारी घेण्यात आली आहे. त्याचा एक भाग म्हणून ठाणे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे. त्या माध्यमातून या बालकांना विविध प्रकारच्या सोयीसुविधा मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.या बालकांना कायदेविषयक बाबींविषयी मार्गदर्शन करण्यात यावे याबाबत जिल्हा कृती दलाच्या बैठकीत जिल्हाधिकारी श्री. नार्वेकर यांनी निर्देश दिले होते. जिल्हा कृती गटाचे सचिव तथा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्री. गायकवाड यांनी जिल्हा सत्र मुख्य न्यायाधीश मंत्री आणि जिल्हा विधी व न्याय सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या. मंगेश देशपांडे यांच्याशी चर्चा केली.

त्यानुसार २३ मार्च रोजी लोक अदालत घेण्यात येणार आहे.या ४४ बालकांचा सांभाळ करणारे त्यांचे पालक, त्यांना समुपदेशन करणारे शासकीय समुपदेशक, जिल्हा तालुका संरक्षण अधिकारी यांना देखील मार्गदर्शन करण्यात येणार आहे. ठाणे बाल कल्याण समिती यांना कायदेशीर पालक घोषीत करण्यासाठी निमंत्रीत करण्यात आल्याचे श्री. गायकवाड यांनी सांगितले.

## विवाहित बहिणीला भेटणाऱ्या तरुणाला ट्रकसमोर फेकलं




नवी दिल्ली : गेल्या चार वर्षांपासून अपहरण आणि हत्या ) प्रकरणात फरार असलेल्या लेडी डॉनच्या मुसक्या आवळण्यात पोलिसांना यश आलं आहे. दिल्ली पोलिसांच्या स्पेशल टीमने निधी उर्फ भारतीला अटक केली आहे. निधीला कोर्टाने फरार घोषित केलं होतं. स्पेशल सेलने निधीला गाझियाबादच्या कॅफेतून अटक केली आहे. दिल्ली पोलिसांचं विशेष पथक तिची चौकशी करत आहे. दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलच्या माहितीनुसार 2015 मध्ये निधी आणि तिचा पती राहुल जाट याच्यासह एकूण नऊ जणांनी दिल्लीतील जीटीबी एन्क्लेव्हमधून सागर नावाच्या तरुणाचं अपहरण केलं होतं. त्यानंतर सगळे जण सागरला घेऊन बागपतला गेले होते. तिथे त्यांनी सागरला धावत्या ट्रकसमोर फेकलं. त्यामुळे सागरचा मृत्यू झाला. वारंवार समज देऊनही विवाहित बहिणीला भेटत असल्याच्या रागातून हे हत्याकांड केल्याचा आरोप आहे.लग्नानंतरही सागर निधीच्या बहिणीला सारखा भेटायचा. निधी आणि तिचा नवरा राहुलने विरोध केला होता. सागरला आपल्या बहिणीपासून दूर राहण्यासाठीही निधीने सांगितलं होतं.

# पोलीस बातमी पत्र

मुंबई

मुंबई, मंगळवार २२ ते २८ मार्च - २०२२




## चिंचवडमध्ये व्यवसायासाठी मदत मागत वृद्धाला 35 लाखांना लुटलं




पिंपरी – शहरात मदतीची मागणी करत जेष्ठ नागरिकाची(senior citizen) आर्थिक फसवणूक केल्याची घटना घडली आहे. व्यवसायासाठी पैशांची गरज असल्याचे सांगत ज्येष्ठ नागरिकाकडून 31 लाख 75 हजार रुपये घेत फसवणूक केल्याची घटना घडली आहे सुब्रय रामा हेगडे (वय 65, रा. पिंपळे गुरव) यांनी याप्रकरणी चिंचवड पोलीस(Chinchwad Police) ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना चिंचवड येथील श्रीधरनगरयेथे घडली आहे. याप्रकरणी चंद्रशील टेकचंद खोब्रागडे, टेकचंद कांथुजी खोब्रागडे, प्रतिभा टेकचंद खोब्रागडे, जयदीप शशिकांत कुत्रे यांच्या विरोधात गुन्हा(Crime) दाखल करण्यात आला आहे. ही घटना 12 फेब्रुवारी 2019 ते 16 मार्च 2022 या कालावधीत ही घटना घडली आहे .

व्यवसायासाठी मागितले पैसे

अशी घडली घटनानी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी सुब्रय हेगडे यांची व आरोपीची ओळख होती. याचा ओळखीचा फायदा घेत आरोपींनी व्यवसायासाठी पैशांची गरज असल्याचे सांगितले. त्यानंतर फिर्यादीकडून तब्बल 31 लाख 75 हजार रुपये घेतले. याचबरोबर मी २०१९ पर्यंत तुमचेसर्व पैसे परत करतो असे सांगितले . मात्र पैसे मिळाल्यानंतर आरोपींनी मुदतीत परत न करता धमकी देऊन फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## गिरीश महाजनांच्या मुलीच्या लग्नात पाकिटमार घुसला, माजी नगरसेवकाचे पैसे चोरण्याचा प्रयत्न

जळगाव : लग्नाचे कार्यक्रम म्हटले की त्यात पाकिटमार आलेच! आता तर चक्क गिरीश महाजनांच्या मुलीच्या लग्नातही पाकिटमारानं डल्ला मारण्याचा प्रयत्न केला. पण पाकिटमाराचा हा प्रयत्न फसला. पाकिट चोरण्यासाठी लग्नात घुसलेल्या या चोरट्या (Thief)ला मग लग्नातील इतर कार्यकर्त्यांनी चांगलाच चोप दिलाय. हा सगळा प्रकार भाजपचे आमदार गिरीश महाजन (Girish Mahajan) यांच्या मुलीच्या लग्नात घडल्यानं चर्चा झाली नसती तरच नवल! नेमकं घडलही तेच! आता या भामट्याला चोप दिल्यानंतर पोलिसांच्या हवाले केलं जाईल. पण थेट गिरीश महाजनांच्या मुलीच्या लग्नात घुसून पाकिट चोरण्यासाठी आलेल्या या चोरट्याला लग्नात आलेल्या इतरांनी चांगलीच अद्दल घडवली आहे. आता चोरट्याला कार्यकर्त्यांनी अखेर हुसकावून लावलंय. सकाळी विवाह पार पडल्यानंतर अनेक मान्यवर गिरीश महाजन यांना भेटण्यासाठी येत होते. यावेळी घराजवळ मोठ्या प्रमाणात गर्दी होती. यावेळी एक पाकिटमार तेथे घुसला. या पाकिटमाराने जामनेरच्या नगरसेवकाच्या खिशात हात घालून पाकिट मारण्याचा प्रयत्न केला. ही बाब नगरसेवकाच्या लक्षात आल्याने त्यांनी लगेच सतर्क होत चोरट्याचा हात



पकडला. त्यानंतर कार्यकर्त्यांनी या चोरट्याला चोप देत पोलिसांच्या स्वाधीन केले. या घटनेमुळे विवाह मंडपाबाहेर एकच तारांबळ उडाली होती.

गिरीश महाजन यांच्या निवासस्थानी पार पडतोय विवाह

गिरीश महाजन यांची द्वितीय कन्या श्रेया हिचा अजय गुजर यांचे चिरंजीव अक्षय यांच्यासोबत आज जळगावच्या जामनेरमध्ये गिरीश महाजन यांच्या निवासस्थानाजवळ विवाह सोहळा पार पडत आहे. या विवाह सोहळ्यासाठी जय्यत तयारी करण्यात आली आहे. लग्न ठिकाणी आकर्षक सजावट केली असून कमळाच्या फुलांच्या प्रतिकृती लावल्या आहेत. सकाळी साडे दहा वाजता विवाह सोहळ्याच्या विधींना सुरवात झाली. सायंकाळी भव्य स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. या विवाह सोहळ्यात केंद्रीय मंत्री नितिन गडकरी, सुधीर मुनगंटीवार, चंद्रशेखर बावनकुळे, आमदार प्रवीण दटके यांच्यासह अनेक राजकीय मंडळी आणि दिग्गज लोकांनी हजेरी लावली आहे.

## दारुबंदी असलेल्या बिहारमध्ये मृत्यूचा शिमगा, 25 जणांचा मृत्यू



बिहार : होळी आणि धुळवडीचा सण देशभरात उत्साहात साजरा करण्यात आला. मात्र बिहारमध्ये या उत्साहाच्या सणाला गालबोट लागले आहे. राज्यातील तीन राज्यात बनावट दारू (Liquor) प्यायल्याने 25 जणांचा मृत्यू (Death) झाला आहे. तसेच मृतांचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. मृतांपैकी 10 जण बांका जिल्ह्यातील आहेत. अनेकांवर रुग्णालयात उपचार सुरु आहेत. राज्यात बनावट दारु विक्री सुरु असून ही दारु प्यायल्यामुळेच सर्व मृत्यू झाल्याची माहिती मृतांच्या नातेवाईकांनी दिली. हे सर्व मृत्यू बनावट दारू प्यायल्यामुळे झाले आहेत. सध्या याबाबत कोणतीही माहिती नाही. सर्व मृतदेहांचे पोस्टमार्टम केले जात आहे. पोस्टमार्टम अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे खरे कारण समोर येईल, असे बांका एसपी अरविंद कुमार गुप्ता यांनी सांगितले.

भागलपूरमध्येही दारुचे सेवन केल्याने काही लोकांचा मृत्यू

भागलपूरच्या नाथनगर भागातील साहेबगंजमध्येही होळीच्या दिवशी दारुचे सेवन केल्याने चौघांचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर अवस्थेत रुग्णालयात उपचार घेत आहे. संदीप यादव, विनोद सिंह, मिथुन कुमार, नीलेश कुमार अशी मृतांची नावे आहेत. दारु प्यायल्यानंतरच आपल्या पतीची तब्येत बिघडली. त्यानंतर काही हालचाली करण्याआधीच पतीचा मृत्यू झाल्याचे मयत विनोदच्या पत्नीने सांगितले. तसेच एका तरुणाची प्रकृती गंभीर असून त्याच्यावर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

विनोद सिंह याच्या कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार, भागलपूरच्या नाथनगर येथील साहेबगंज परिसरात होळीच्या दिवशी सकाळी सर्वजण दारूची बाटली घेऊन घरी आले. त्यानंतर त्यांनी दारू प्यायली. मात्र काही वेळाने त्यांची प्रकृती अधिकच बिघडली. मृत सर्व एकाच गावातील आहेत. रुग्णालयात दाखल केले असता सर्वांचा संशयास्पद मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

## कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या



यवतमाळ : कर्जबाजारीपणामुळे एका शेतकऱ्या (Farmer)ने गळफास घेऊन आत्महत्या (Suicide) केल्याची घटना नेर तालुक्यातील मालखेड बुद्रुक येथे घडली आहे. प्रकाश उत्तम मानकर (54) असे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव आहे. सततच्या नापिकीपणामुळे बँकेचे कर्ज वाढतच होते. यामुळे शेतकरी मानकर हे नैराश्येत होते. यातूनच त्यांनी टोकाचे पाऊल उचलले. याप्रकरणी नेर पोलिस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आली असून पोलिस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

नापिकीमुळे कर्जाचा डोंगर वाढत होता

प्रकाश मानकर यांच्याकडे 10 एकर शेती आहे. या शेतीसाठी मानकर यांनी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या उत्तर वाढोना शाखेतून कर्ज घेतले होते. मात्र नैसर्गिक आपत्ती आणि नापिकीमुळे त्यांना कर्जाची परतफेड करणे शक्य होत नव्हते. त्यामुळे कर्जाचा डोंगर वाढतच होता. यामुळे मानकर सतत चिंतेत असायचे. याच विवंचनेतून मानकर यांनी रविवारी सकाळी आपला भाऊ पुरुषोत्तम मानकर यांच्या शेतामध्ये गळफास घेत आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी सदर शेतामध्ये धाव घेतली. यानंतर नेर पोलिस ठाण्यात घटनेची माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह शवविच्छेदनासाठी स्थानिक ग्रामीण रुग्णालयात पाठवला. मानकर यांच्या पश्चात एक मुलगा आणि पत्नी असा परिवार आहे.

## नागपुरात आठ वर्षीय गतिमंद बालिकेवर लैंगिक अत्याचार

नागपूर : अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या घटना थांबण्याचे नावच घेत नाहीत. अशीच एक मानवतेला काळिमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. नागपूरमधील इमामवाडा पोलीस स्टेशन अंतर्गत रामबाग परिसरात राहणाऱ्या एका आठ वर्षीय गतिमंद बालिके (Minor Girl)वर आज दुपारी बलात्कार (R a p e ) झाल्याची घटना घडली आहे. पीडितेच्या घराच्या पाठीमागे राहणाऱ्या 42 वर्षीय आरोपीने बलात्कार केला झाले. पीडित बालिका गतिमंद असून ती घराबाहेर खेळत असताना आरोपीने तिला आपल्या घरात नेऊन तिच्यावर अत्याचार केला. याप्रकरणी इमामवाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

इमामवाडा पोलिसाकंडून आरोपीला बेड्या

पीडित मुलगी दुपारी आपल्या घराबाहेर खेळत होती. यावेळी




आरोपीने तिला आपल्या घरी नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. याबाबत पीडितेच्या कुटुंबीयांना कळताच त्यांनी तात्काळ इमामवाडा पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा दाखल करीत तात्काळ आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. सूरज लोखंडे असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी पीडितेला नागपूरच्या शासकीय वैद्यकीय रुग्णालयात दाखल केले असून तिथे तिच्यावर उपचार सुरू आहेत.

आरोपीचा मुलगाही काही गुन्ह्यांमध्ये सध्या तुरुंगात

आरोपी लोखंडे हा घरी एकटाच राहतो. त्याची पत्नी काही घरगुती कारणामुळे त्याला सोडून गेली आहे. तर त्याचा मुलगा काही गुन्ह्यांमध्ये तुरुंगात आहे. आरोपीच्या मुलाची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे. दरम्यान या घटनेमध्ये आरोपीला आणखी कोणी मदत केली का याची चौकशी पोलीस करत आहेत. शेजाऱ्याने बलिकेवर अत्याचार केल्याच्या या घटनेमुळे परिसरात चिंतेच वातावरण निर्माण झालं असून, अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

## बैलगाडी शर्यतीदरम्यान झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू; आयोजकांवर गुन्हा दाखल



धुलीवंदनाचे औचित्य साधून कर्जत तालुक्यातील उक्रूळ येथे बैलगाडी शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेदरम्यान अपघात होऊन दौलत बाजीराव देशमुख या ६६ वर्षीय जेष्ठ नागरीकाचा मृत्यू झाला. या घटनेनंतर स्पर्धेच्या आयोजकांविरोधात सदोष मनुष्यवधासह इतर कलमांखाली नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

धुलीवंदनाचे औचित्य साधून या बैलगाडी स्पर्धेचे सकाळी साडे दहा ते दुपारी तीन दरम्यान आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी जिल्हाधिकारी यांची परवानगी घेण्यात आली नव्हती. बेकायदेशीरपणे सुरु असलेल्या या स्पर्धे दरम्यान एक बैलगाडी प्रेक्षकांमध्ये घुसली. यात दौलत बाजीराव देशमुख गंभीररीत्या जखमी झाले. डोक्याला गंभीर दुखापत होऊनही त्यांना आयोजकांनी उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले नाही. शेवटी काही जणांनी मोटर सायकलवर त्यांना नेऊन रायगड रुग्णालयात दाखल केले. रक्तस्त्राव मोठ्या प्रमाणात झाल्याने त्यांना पनवेल येथे दाखल करण्यास सांगण्यात आले. मात्र तिथे त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

या घटनेनंतर स्पर्धेच्या आयोजकांवर कारवाई करण्याची मागणी केली जात होती. अखेल रविवारी दुपारी नेरळ पोलीस ठाण्यात बैलगाडी स्पर्धेच्या आयोजकांवर गुन्हा दाखल करण्यात आला. भा.द.वि कलम ३०४ अ,२७९,३३७, ३३८, १८८, २६९, २७०, २७१, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) चे उलंघन १३५ आपत्ती व्यवस्थापन कायदा कलम ५,१, प्राण्यांना क्रूरतेने वागणूक प्रतिबंध कायदा १९६० चे कलम ११(१),(क) प्रमाणे हा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस निरीक्षक तेंडुलकर या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## धूळवडीच्या दिवशी फुकटात कोंबड्या मागून विक्रेत्यास मारहाण करणाऱ्यास अटक



धूळवडीच्या दिवशी मांसाहार करण्यासाठी एका कोंबडी विक्रेत्यास फुकटात कोंबडी मागून, त्याला लोखंडी रॉडने माराहण करणाऱ्यास अटक करण्यात आली आहे. पुण्यातील मावळ परिसरात हा प्रकार घडला आहे. या प्रकरणी वैभव सावंत यांनी तळेगाव पोलिसात तक्रार दिली असून, नवनाथ कदम याला तळेगाव पोलिसांनी अटक केली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वैभव सावंत यांचा कोंबड्या विकण्याचा व्यवसाय करतात. काल धुलीवंदन असल्याने ते पहाटेच विविध गावात जाऊन ते चिकन दुकानदारांना कोंबड्या विकत होते. दरम्यान, ते तळेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नवलाख उंबरे येथे चिकन दुकानदाराला कोंबड्या विकण्यास गेले, तेव्हा आरोपी नवनाथ कदम याने मला खायला फुकट कोंबड्या दे असे म्हणून त्यांच्याशी वाद घातला. तक्रारदार वैभव यांनी कोंबड्या देण्यास नकार दिल्यावर आरोपीने त्यांना लोखंडी रॉडने डोक्यात मारून गंभीर जखमी केले.

## अंगावर होळी पडून एकाचा दुर्दैवी मृत्यू, रत्नागिरीच्या पावसमधील धक्कादायक घटना

रत्नागिरी : होळीनिमित्त (Holi Festival) राज्यभरात विविध कार्यक्रम साजरे करण्यात आले. मात्र, रत्नागिरी (R a t n a g i r i ) जिल्ह्यातील पावसमध्ये शुक्रवारी होळीनिमित्त सुरमाडाची होळी करण्यात आली. यावेळी दुर्दैवी घटना घडल्याचं समोर आलं आहे. ही धक्कादायक घटना इतकी भीषण होती की हा व्हिडीओ (Video) पाहणाऱ्याच्या अंगावरही काटा येईल. या होळी उत्सवादरम्यान अंगावर होळी पडून चंद्रकांत सलपे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना इतकी भीषण होती की पाहणाऱ्यांच्याही अंगावर काटा येईल. घटना घडताच सलपे यांनी जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, यावेळी डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. ही धक्कादायक घटना व्हिडीओतून समोर आली आहे. हा प्रकार रत्नागिरी तालुक्यातील पावस इथं शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडलाय. ही धक्कादायक घटना राज्यभरात वाऱ्यासारखी पसरली असून याचा व्हिडीओ समोर आला आहे.

होळी उत्साह असला की अंगात जोष असतो. यावेळी चहुकडे आनंद असल्याने खबरदारी देखील घेतली जात नाही. रत्नागिरीच्या जिल्ह्यातील पावसमध्ये शुक्रवारी होळीनिमित्त सुरमाडाची होळी करण्यात आली होती. यावेळी एक धक्कादायक घडली. ती घटना एका व्हिडीओतून समोर आली. हा इतकी भीषण



व्हिडीओ (Video) होता की पाहणाऱ्याच्या अंगावरही काटा येईल. या होळी उत्सवादरम्यान अंगावर होळी पडून चंद्रकांत सलपे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना इतकी भीषण होती काही वेळ अचानक काय झालं हे अनेकांच्या लक्षातच आलं नाही. घटना घडताच सलपे यांनी जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.


### मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे-४०१ १०१,दुरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८, Email :- mbmc.pro2012@gmail.com
जनसंपर्क विभाग

जा.क्र.मनपा/जनसंपर्क/ ५८० /२०२१-२२ दि.:- १५ /०३ / २०२२

**|| EXTENTION ||**

Kindly refer to the Tender Notice No. 64 (2021-22) published on Dt.08/03/2022 in Thane Vaibhav & Police Baatamipatra For the work in Tender Notice No.64 (2021-22) (777177_1) tender notice submission date was Dt.14/03/2022 up to 1.00 p.m. is extended Dt.23/03/2022 up to 1.00 p.m.

Other conditions shall remain unchanged.

Ref.: MBMC / PRO / 580 / 2021-22
Date : 15 /03 / 2022

**Water Supply Department**
**Mira-Bhainder Municipal Corporation**


## धुंद धुळवडीचा २६६ जणांना फटका; एक लाखाहून अधिक दंड वसूल



होळी निमित्त आयोजित धुळवडीचा कार्यक्रम साधेपणात साजरा करा, असे आवाहन कल्याण-डोंबिवली पालिका प्रशासन, पोलीस आणि वाहतूक पोलिसांनी करूनही शुक्रवारी धुळवडीच्या दिवशी अनेक उत्साही तरुणांनी मद्यपान करून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून धुळवड साजरी केल्याने अशा एकूण २६६ जणांवर वाहतूक पोलिसांनी दंडात्मक कारवाई केली आहे.

डोंबिवली, कल्याण आणि कोळसेवाडी वाहतूक विभागांतर्गत ही कारवाई करण्यात आली. कल्याण वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश तरडे, डोंबिवली विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गित्ते, कोळसेवाडी विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली वाहतूक पोलीस, वाहतूक सेवकांनी कारवाई केली.

होळीच्या दुसऱ्या दिवशी धुळवडीच्या दिवशी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस, वाहतूक पोलिसांनी शहराच्या विविध भागात बंदोबस्त लावला होता. या कालावधीत अनेक उत्साही तरुणांनी मद्यपान, भांग, ताडी नशा आणणारी पेय पिऊन दुचाकी वाहने चालवली. एक दुचाकीवर दोन आसनांची क्षमता असताना एकेका दुचाकीवर तीन ते चार तरुण बसले असल्याचे आढळले. दुचाकीस्वाराकडे वाहनाची कागदपत्र, विम्याची कागदपत्रे नव्हती.

संपादकीय...



## चिंताजनक विळखा

पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर, कल्याणकारी कार्यक्रमांच्या परिणामकारक अंमलबजावणीचा मुद्दा चर्चेत आहे. थेट लाभार्थ्यांपर्यंत विकास योजना पोहोचविल्यास किंवा सर्वसामान्यांना वीज, पाणी, शिक्षण, आरोग्य आदी मूलभूत सेवा आणि सुविधा मोफत दिल्यास मतदार ठामपणे मागे उभे राहतात, असा निष्कर्षही काढला जातोय. मोदी सरकारच्या योजना आणि आम आदमी पक्षाच्या (आप) दिल्लीतील योजना यांकडे अंगुलिनिर्देश करीत भारतीय जनता पक्ष आणि 'आप'च्या विजयाचे विश्लेषण केले जात आहे. मोफत योजना किंवा कल्याणकारी कार्यक्रम आणि निवडणुकांतील यश यांच्यात सहसंबंध असेलही; परंतु अशा योजना सर्वंकष विकासाला, रोजगाराला रोजगार निर्मितीला पर्याय ठरत नाहीत. रोजगार निर्मितीसाठी उद्योगांना पोषक स्थिती हवी असते आणि त्यासाठी पूरक धोरणांची गरज असते. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) रोजगारांबाबत (पीएलएफएस) अलीकडेच जारी केलेली आकडेवारी महत्त्वाची




ठरते. देशातील रोजगारक्षम मनुष्यबळाची नियमितपणे होणारी पाहणी एक प्रकारे धोरणकर्त्यांसमोर आरसा धरत असते. गेल्या वर्षीच्या (२०२१) एप्रिल ते जून या तिमाहीत शहरी भागातील बेरोजगारीचा दर १२.६ टक्क्यांवर गेला होता आणि तो आधीच्या तिमाहीपेक्षा ३.३ टक्क्यांनी अधिक होता, असे निरीक्षण या अहवालाने नोंदविले आहे. गेल्या वर्षी एप्रिल ते जून या काळात देशात करोना साथरोगाची दुसरी लाट होती. तिचा फटका उद्योगांना आणि पर्यायाने रोजगारांना बसल्याचे दिसते. हा फटका करोनाच्या पहिल्या लाटेत अधिक जोरकस होता. एप्रिल ते जून २०२० या काळात बेरोजगारीचा दर २०.८ टक्क्यांपर्यंत गेला होता. अचानक लागू करण्यात आलेल्या लॉकडाउनचा परिणामही त्यात होता. त्या तुलनेत दुसऱ्या लाटेत बेरोजगारीचा दर कमी झाला असला, तरी तो लक्षणीय होता. गेल्या काही महिन्यांत तो कमी होत असल्याचे 'सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी'च्या (सीएमआयई) आकडेवारीवरून दिसत असले, तरी तो अजूनही साडेसात टक्क्यांहून अधिकच आहे.

भारत हा तरुणांचा देश असल्याचे अभिमानाने सांगितले जात असले, तरी येथील तरुणांच्या हातांना काम नाही; काम वेगाने निर्माण होताना दिसत नाहीत, हे सत्य विविध अहवाल सातत्याने अधोरेखित करीत आहेत. तरुणांची संख्या अधिक असल्यास जोमाने काम करून समाज आणि देशाला प्रगतिपथावर ठेवता येते; लोकसंख्या अधिक असलेल्या देशांना तरुणांच्या संख्याबळाचा लाभ मिळतो. याला 'डेमोग्राफिक डिव्हिडंड' असे म्हणतात. भारताला हा लाभ मिळणार असून, त्याद्वारे तो स्वतःसाठीच नव्हे, तर जगातील अनेक देशांसाठी प्रशिक्षित आणि कार्यक्षम मनुष्यबळ पुरवू शकेल, असे गेल्या दोन दशकांपासून सांगितले जात आहे. हे प्रत्यक्ष साकारताना काही दिसलेले नाही. प्रशिक्षित आणि कार्यक्षम मनुष्यबळासाठी शिक्षणसुविधा वाढविण्याची आणि उद्योगपोषक स्थिती निर्माण करण्याची गरज असते. तिची पूर्तता झालेली नाही. त्यामुळे बेरोजगार तरुणांची मोठीच्या मोठी फौज देशात तयार होत आहे. गेल्या काही वर्षांत सेवा क्षेत्राचा चांगला विस्तार झाला आणि रोजगारसंधी वाढल्या; परंतु कोव्हिडमुळे या क्षेत्राचा संकोच झाला. उत्पादन उद्योग मात्र आधीपासूनच आक्रसत होता. या सर्वच क्षेत्रांची भरभराट होईल अशी धोरणे राबविण्याची आवश्यकता आहे. उद्योगांना आकृष्ट करून घेण्याच्या घोषणा केंद्रातील आणि राज्यातील सरकारे सातत्याने करीत आहेत; मात्र अंमलबजावणी करताना आरोप-प्रत्यारोपाच्या राजकीय फैरी झडतात आणि उद्योग कागदावर राहतात, असा अनुभव आहे. रोजगार वाढत नसल्याने मग कल्याणकारी योजनांच्या नावाखाली मोफत सुविधा दिल्या जातात. मात्र, त्यामुळे ना संबंधित घटकांचे दीर्घकालीन भले होते, ना विकास गतिमान होतो. देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी हे चांगले नाही.अर्थव्यवस्थेचे हित साधणारा मार्गच यासाठी अवलंबावा लागेल. केंद्रातील सत्ताधारी भाजपची मातृसंस्था असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अहमदाबाद येथे नुकत्याच झालेल्या बैठकीतही वाढत्या बेरोजगारीवर चिंता व्यक्त केली गेली. रोजगार निर्माण करणारी भारतीय अर्थव्यवस्थेचे प्रारूप विकसित करण्याची गरज या बैठकीत व्यक्त केली गेली. लघुउद्योग आणि शेती यांवर भर देणारे हे प्रारूप मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण करील काय यावर मतभिन्नता असू शकते; परंतु रोजगार वाढविण्यासाठी त्वरेने हालचाल करण्याची गरज आहे याबाबत दुमत असण्याचे कारण नाही. रोजगार निर्मितीसाठी वास्तविक शाश्वत वृद्धीचे प्रारूप विकसित करण्याची आवश्यकता असून, त्यासाठी धोरणात्मक पावले उचलायला हवीत.

# फलंदाजीलाच झुकते माप



एमसीसीने नुकतेच क्रिकेटचे काही नियम बदलले. क्रिकेट हे फलंदाजीधार्जिणे होत चालले आहे. या नव्या नियमांतही एक 'मंकडिंग'ला अखिलाडू न ठरवता आता धावबाद ठरवले जाईल, या नियमाखेरीज बाकीचे नियमही फलंदाजीलाच झुकते माप देणारे आहेत.

भारतीय क्रिकेट संघाचा १९४७-४८चा ऑस्ट्रेलिया दौरा भारताच्या दृष्टीने फारसा संस्मरणीय नव्हता. पाच कसोटी सामन्यांची मालिका भारताने ४-० अशी गमावली, पण या मालिकेत जन्म झाला तो 'मंकडिंग' पद्धतीने फलंदाज बाद होण्याचा. भारताचे महान अष्टपैलू विनू मंकड यांनी सराव सामन्यात ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर बिल ब्राऊनला धावचीत केले. हे धावचीत विचित्र पद्धतीने यासाठी होते, कारण ब्राऊन नॉन स्ट्रायकिंग एंडला असताना क्रीज सोडून पुढे गेल्याने गोलंदाज मंकडने त्याला चेंडू न टाकताच त्याला धावबाद केले. पुढे सिडनी कसोटीत पुन्हा बिल ब्राऊनलाच तशाच पद्धतीने धावबाद केले. ऑस्ट्रेलियन मीडियाने या पद्धतीने मंकड यांनी सलग दोनदा बाद केल्यावर बरीच आगपाखड केली आणि अशा पद्धतीने बाद करण्याला 'मंकडिंग' असे नाव दिले. पुढे क्रिकेटचे मायबाप मेरिलिबोन क्रिकेट क्लब अर्थात एमसीसीने या पद्धतीने बाद करण्याला क्रिकेटच्या नियम क्रमांक ४१, जो 'अनफेअर प्ले' म्हणजे अखिलाडू खेळाबाबत आहे त्यात समाविष्ट केले. दोन वर्षांपूर्वी जेव्हा आयपीएलमध्ये रविचंद्रन अश्विनने जोस बटलरला 'मंकडिंग' केले तेव्हा पुन्हा एकदा हा खेळाचा भाग की अखिलाडू खेळ हा वाद उफाळून आला. गेल्या ७० वर्षांत हे 'मंकडिंग' अधूनमधून होत राहिले. चार वेळा प्रत्येकी कसोटी आणि एक दिवसीय सामन्यात हे झाले, एका टी ट्वेन्टी मध्ये झाले तर प्रथम दर्जाच्या सामन्यात हे अनेकदा झाले. गेली जवळपास ७० वर्षे असलेला हा नियम एमसीसीने नुकताच बदलला. एमसीसीने क्रिकेटच्या नियमावलीत जे अलीकडे फेरफार केले त्यातला हा एक प्रमुख निर्णय. 'मंकडिंग'ची उचलबांगडी अखिलाडू खेळाच्या नियम क्रमांक ४१ मधून करून धावबादचे जे नियम क्रमांक ३८ मध्ये दिले आहेत त्यात करण्यात आली.

क्रिकेटचे सत्ताकेंद्र आर्थिक सत्तेमुळे भारतात आले असले तरी क्रिकेटच्या संस्काराचे काम अजूनही मेरिलिबोन क्रिकेट क्लबच करते. नुकतेच एमसीसीने क्रिकेटच्या नियमावलीत अनेक बदल जाहीर केले. हा मंकडिंगबद्दलचा एक प्रमुख बदल आणि त्याचबरोबर दुसरा महत्त्वाचा बदल म्हणजे चेंडूला लकाकी आणायला थुंकीच्या वापरावर कायमची बंदी आणणे. क्रिकेटच्या चेंडूची लकाकी खेळातल्या वेगवेगळ्या टप्प्यावर टिकवणे गरजेचे असते. डावाच्या सुरुवातीला जेव्हा चेंडू नवा असतो तेव्हा जलदगती गोलंदाजांना स्विंग मिळण्यासाठी ही लकाकी टिकवणे गरजेचे असते त्याचप्रमाणे चेंडू जसजसा जुना होईल तसतसे रिव्हर्स स्विंग मिळविण्यासाठी चेंडूच्या एका बाजूची लकाकी टिकवणे गरजेचे असते. ही लकाकी टिकवायला घाम अथवा थुंकी वापरायची प्रथा पूर्वापार चालत आली आहे. करोनाने क्रिकेट ठप्प झाल्यावर जेव्हा पुन्हा क्रिकेट सुरू करण्यात आले तेव्हा आयसीसीने काही करोना प्रतिबंधक मार्गदर्शक तत्त्वे आणली. यात खेळाडूंना चेंडूला थुंकी लावायला मज्जाव करण्यात आला. फलंदाजांचा षटकार प्रेक्षकात गेला तर चेंडू पुन्हा मैदानात आल्यावर पंच सॅनिटायझरचा वापर करून चेंडू निर्जंतुक करतील वगैरे अशा नवीन मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश केला.

एमसीसीने नुकत्याच जाहीर केलेल्या नियमावली बदलात हे चेंडूची लकाकी राखायला थुंकी लावणे इतिहासजमा करून टाकले. त्यांनी कुठचा आणि कधी संशोधनात्मक अभ्यास केला, याचा सखोल उल्लेख केला नाही; पण या संशोधनाच्या आधारे त्यांना आढळून आले, की या करोनानंतरच्या काळात थुंकीशिवाय चेंडूची लकाकी राखता आली तेव्हा चेंडूला थुंकी लावायची गरज नाही. एमसीसीच्या नियमात घामाचा वापर करायला बंदी नाही; पण प्रश्न असा पडतो इंग्लंडमध्ये सरत्या उन्हाळ्यात किंवा एकूणच लहरी हवामानात, न्यूझीलंडमध्ये त्यांच्या अगदी ऐन उन्हाळ्यात खेळतानाही घाम येत नाही तेव्हा चेंडूला लकाकी आणायला पर्याय काय? घाम नसताना काही परदेशी खेळाडू लाळ सुटायला मदत होईल अशा गोड गोळ्या खाऊन लाळेच्या निर्मितीचा स्रोत अबाधित राखायचे. तेव्हा लाळ लावणे नियमात असले तरी अशी कृत्रिम लाळनिर्मिती करणे अखिलाडू वृत्तीत धरले जाऊ शकले असते, पण ती नियमातली पळवाट होती. आता एमसीसी म्हणते, घामाने लकाकी राखायला तितकीच मदत होते तेव्हा लाळेची गरज नाही.

या मंकडिंग आणि लाळ वापरायला प्रतिबंध या प्रमुख बदलांखेरीज अजूनही अनेक नियमात बदल सुचवले आहेत. नियम क्रमांक १ नुसार जेव्हा बदली खेळाडू मैदानात उतरेल तेव्हा ज्या खेळाडूसाठी तो बदली म्हणून असेल त्या मूळ खेळाडूवर घातलेली सगळी बंधने, नियम या बदली खेळाडूला लागू होतील. नियम क्रमांक १८ नुसार जेव्हा फलंदाज झेल देऊन बाद होईल तेव्हा झेल घेईपर्यंत त्या फलंदाजाने झेल सुटला तर धाव मिळावी या हेतूने कितीही खेळपट्टी ओलांडली असेल, तरी जर तो झेलबाद झाला तर नवीन येणारा खेळाडू हा स्ट्राइक घेईल. पूर्वी खेळाडूने अर्धी धावपट्टी ओलांडली असेल तर नाबाद नॉन स्ट्रायकर पुढचा चेंडू खेळायचा. 'डेड बॉल' ठरवायच्या दोन नियमांत बदल सुचविण्यात आला आहे. नियम क्रमांक २० मध्ये खेळात व्यत्यय आणणारी कुठचीही घटना घडली, जसे एखादा कुत्रा मैदानात शिरला तर तो चेंडू डेड बॉल समजण्यात येईल. नियम क्रमांक २१ नुसार गोलंदाजाने चेंडू न टाकताच जर समोरच्या फलंदाजाला चेंडू फेकून धावबाद केले तरी तो आता 'डेड बॉल' समजण्यात येईल. चेंडू वाइड ठरवायच्या नियम क्रमांक २२ मध्ये फलंदाज गोलंदाजाने चेंडू टाकायच्या आधी ज्या जागेवर उभा असेल ती जागा वाइड ठरवायला प्रमाण मानली जाईल. नियम क्रमांक २५.८ नुसार आता फलंदाजाला पडलेला कुठचाही चेंडू खेळायचा अधिकार दिलेला आहे. फक्त फलंदाजाची बॅट किंवा शरीर यांचा काही भाग खेळपट्टीवर असायला हवा. थोडक्यात पूर्वी गोलंदाजाच्या हातून चेंडू चुकून सुटला आणि अपेक्षित टप्पा व दिशा सोडून भरकटत असला तर तो 'डेड बॉल' जाहीर केला जायचा. आता असा चेंडू खेळताना फलंदाजाचे शरीर अथवा बॅट पूर्णपणे खेळपट्टीच्या बाहेर असेल तरच तो 'डेड बॉल' समाजला जाईल. अजून एक महत्त्वाचा बदल म्हणजे नियम क्रमांक २७.४ आणि २८.६ नुसार चेंडू टाकताना क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाने क्षेत्ररक्षणात बदल केला तर आतापर्यंत फक्त 'डेड बॉल' समजले जायचे, पण यापुढे फलंदाजी करणाऱ्या संघाला पाच धावा पेनल्टीच्या स्वरूपात मिळतील.

क्रिकेटमध्ये आज तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. डिजिटल माध्यमाची गरज ओळखून निर्णयक्षमतेची अचूकता वाढवायला अनेक नवे नवे नियम निर्माण झाले पण मेरिलिबोन क्रिकेट क्लबने जाहीर केलेले अथवा सुचवलेले हे बदल हे क्रिकेटच्या मूळ ढाच्यातील बदल आहेत. त्यामुळे या बदलांना महत्त्व आहे. खेळाला नियमांची बंधने असल्याशिवाय सुसूत्रता तर येणार नाहीच; तेव्हा मूलभूत नियमात काळानुसार बदल अपेक्षित असतातच आणि निव्वळ नियमाच्या जोरावर २०१९ चा विश्वचषक जिंकणाऱ्या इंग्लडला नियमांच्या कंगोऱ्यांचा फायदा नक्कीच माहिती आहे. आज क्रिकेट हे फलंदाजीधार्जिणे होत चालले आहे. या नव्या नियमातही एक 'मंकडिंग'ला अखिलाडू न ठरवता आता धावबाद ठरवले जाईल, या नियमाखेरीज बाकीचे नियमही फलंदाजीलाच झुकते माप देणारे आहेत. तेव्हा गरज आहे तो फलंदाजी आणि गोलंदाजीला समान फायदा मिळेल अशा समतोल बदलांची!

## अंबरनाथमध्ये चोरी आणि घरफोडीच्या दोन गुन्ह्यांची उकल, चोरट्याला पोलिसांकडून बेड्या



अंबरनाथमध्ये चोरी आणि घरफोडीच्या दोन गुन्ह्यांची उकल, चोरट्याला पोलिसांकडून बेड्या

अंबरनाथ : रात्रीच्या वेळी स्वतःच्याच परिसरात फिरून चोऱ्या करणाऱ्या एका चोरट्या (Thief)ला अंबरनाथच्या शिवाजीनगर पोलिसांनी बेड्या (Arrest) ठोकल्या आहेत. देवप्रकाश राय असे त्याचे नाव असून त्याची रवानगी आता न्यायालयीन कोठडीत करण्यात आली आहे. आरोपीकडून दोन मोबाईलसह 40 हजार रुपये रोख हस्तगत करण्यात आले आहेत. एका मोबाईल चोरीच्या गुन्ह्यात राय याचा माग काढत पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या. त्यानंतर पोलिस चौकशीत त्याने चोरीच्या गुन्ह्यांचीही कबुली दिली.


आरोपीकडून चोरीच्या घटनांची उकल

अंबरनाथच्या जुने अंबरनाथ गाव, धर्माजी कॉलनी परिसरात हा चोरटा चोऱ्या करत होता. या भागात राहणाऱ्या चंद्रपाल मौर्या यांच्या घरी त्याने 27 जून 2020 च्या रात्री चोरी करून 76 हजार 100 रुपयांची रोकड चोरली होती. तर याच भागात राहणाऱ्या अब्रार शाह याच्या घरून त्याने 4 मार्च 2022 च्या रात्री दोन मोबाईल चोरून नेले होते. तसेच 2020 साली चंद्रपाल मौर्या यांच्या घरी केलेल्या चोरीचीही कबुली त्याने दिली. त्याच्याकडून चोरी करण्यात आलेल्या 2 मोबाईल फोनसह 40 हजार रुपयांची रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. सध्या त्याची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आल्याची माहिती शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर भोगे यांनी दिली आहे.

पुण्यात मोबाईल आणि लॅपटॉप चोरटे अटकेत

पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात मोबाईल फोन आणि लॅपटॉपची चोरी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीला जेरबंद करण्यात पुणे ग्रामीण पोलिसांना यश आले आहे. स्थानिक गुन्हे शाखेने परराज्यातील दोन चोरांना अटक करत चोरीचे 30 मोबाईल आणि दोन लॅपटॉप जप्त केले आहेत. या आरोपींवर विविध पोलिस ठाण्यात चोरीचे 10 गुन्हे दाखल आहेत. सौंदाराजन गोविंदा आणि बालाजी सल्लापुरी अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. दोन्ही आरोपींना शिक्रापूर पोलिसांच्या ताब्यात सुपूर्द करण्यात आले असून पुढील तपास शिक्रापूर पोलीस करत आहे.

## मुलीचा मृत्यू अपघाती नाही तर घातपात




चंद्रपूर : प्रियकराची भेट घेण्यासाठी चोराळा शिवारात गेलेल्या एका युवतीचा अपघाती मृत्यू झाला. पडोली पोलिसांनी सखोल चौकशी न करता प्रियकर अभिषेक देशभ्रतार याने दिलेल्या माहितीनुसार अपघाताचा गुन्हा नोंद केला. दरम्यान, मृत मुलीच्या कुटुंबीयांनी तिच्यावर सामूहिक अत्याचार करून हत्या केल्याचा संशय व्यक्त केला आहे. तेव्हा या प्रकरणाची चौकशी सीबीआय किंवा उपविभागीय पोलीस अधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांकडून करावी, अशी मागणी मृत मुलीचा भाऊ नितेश मेहता व युवा स्वाभिमान पार्टीचे जिल्हाध्यक्ष सूरज ठाकरे यांनी केली आहे.

चोराळा शिवारात १६ मार्चला दुपारच्या सुमारास शीतलचा घातपात करून नियोजित पद्धतीने तिचा प्रियकर व त्याच्या साथीदारांकडून खून करण्यात आला आहे. या प्रकरणात पडोली पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. जिल्हा सामान्य रुग्णालयात तिच्या कुटुंबीयांनी पाहिलेल्या स्थितीवरून सामूहिक अत्याचार केल्याचे स्पष्ट दिसून येते. पोलिसांकडून अपघात दाखवला जात असला तरी शीतलच्या दुचाकीला किंवा शरीराला कुठेही जखमा नाही. केवळ गुप्तांगाला इजा झाली असल्याने तिचा प्रियकर व साथीदारांनी शीतलवर सामूहिक अत्याचार करून खून केल्याचा आरोप निलेश आणि सूरज ठाकरे यांनी केला आहे. शीतलची मैत्रीण या प्रकरणात मुख्य साक्षीदार असताना तिचे अद्यापही बयाण घेण्यात आलेले नाही. पडोली पोलिसांकडून कोणत्याही शंकेचे निराकरण केले जात नाही. सदर घटना १६ मार्चला घडली असताना १७ मार्चला दुपारी १२ वाजेपर्यंत शवविच्छेदन करण्यात आले नव्हते. अशा प्रकरणात पॅनेलमध्ये शवविच्छेदन करण्यात आलेले नाही. शीतलच्या मृत्यूप्रकरणात पोलिसांनी प्रियकराच्या सांगण्यावर विश्वास ठेवून अपघाताची नोंद केली आहे. घटनेच्या वेळी प्रियकरासोबत आणखी चार साथीदार होते. त्यांचीही चौकशी करण्यात आली नाही.


**परिपत्रक – 4**

**(नियम 8 पहा)**

**पोलीस बातमीपत्र (जि. ठाणे ) या वृत्तपत्राच्या मालक आणि इतर तपशील खालीलप्रमाणे**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | प्रकाशनाचे स्थळ | : | 2, राजाराम सी.एच.एस.लि., बंदरवाडी, नवघर रोड, शनिमंदीराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे 401105. |
| 2) | प्रकाशनाचा कालावधी | : | साप्ताहिक |
| 3) | मुद्रकाचे नाव | : | सोमाणी प्रिंटींग प्रेस (हंसाबेन मेहता) |
| | नागरिकत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | गाला नं. 4, एन.के.इंडस्ट्रियल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रियल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. 2, गोरेगाव (पुर्व), मुंबई 400063. |
| 4) | प्रकाशकाचे नाव | : | दिपक मोरेश्वर नाईक |
| | नागरिकत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | 2, राजाराम सी.एच.एस.लि., बंदरवाडी, नवघर रोड, शनिमंदीराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे 401105. |
| 5) | संपादकाचे नाव | : | दिपक मोरेश्वर नाईक |
| | नागरिकत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | 2, राजाराम सी.एच.एस.लि., बंदरवाडी, नवघर रोड, शनिमंदीराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे 401105. |
| 6) | मालकाचे नाव | : | दिपक मोरेश्वर नाईक |
| | नागरिकत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | 2, राजाराम सी.एच.एस.लि., बंदरवाडी, नवघर रोड, शनिमंदीराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे 401105. |

**मी दिपक मोरेश्वर नाईक घोषीत करतो की वर नमुद केलेली संपुर्ण माहिती पुर्णपणे सत्य आहे.**

**तारीख : 22.03.2022**

**सही /-**
**दिपक मोरेश्वर नाईक**

## मुलीशी मैत्रीसंबंध; युवकाचा खून ; महिलेसह चौघे अटकेत; वारजे भागातील घटना




पुणे : मुलीशी असलेले मैत्रीसंबंध तोडून न टाकल्याने एका युवकावर शस्त्राने वार करून त्याचा खून करण्यात आल्याची घटना वारजे भागात घडली. या प्रकरणी एका महिलेसह चौघांना वारजे पोलिसांनी अटक केली.प्रद्युम्न प्रकाश कांबळे (वय २२, रा. रामोशीवाडी, सेनापती बापट रस्ता) असे खून झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी अजय विजय पायगुडे (वय १९), विजय किसन पायगुडे (वय ५०), वंदना विजय पायगुडे (सर्व रा. साईश्रद्धा रेसीडन्सी, दांगट पाटीलनगर, शिवणे), सागर गोिवद राठोड (वय २१, रा. लक्ष्मीनगर, डहाणूकर कॉलनी, कोथरूड) यांना अटक करण्यात आली आहे. याबाबत एका अल्पवयीन मुलाने वारजे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. अल्पवयीन मुलाचा आतेभाऊ कांबळे याचे पायगुडे यांच्या नात्यातील एका मुलीशी मैत्रीसंबंध होते.

## स्वत:च्या शेतीवर राखणदारीला गेलेल्या शेतकऱ्याचा मृतदेह आढळला, भंडारा कलेवाडा शेतशिवारातील घटना

भंडारा : वन्यप्राण्यांद्वारे शेतातील पिकांचे संरक्षण व्हावे म्हणून रात्री आपल्या शेतात जागरणाला गेलेल्या शेतकऱ्या (Farmer)चा मृतदेह (D e a d b o d y ) आढळल्याची धक्कादायक घटना भंडारा जिल्ह्याच्या कलेवाडा येथे घडली आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून संबंधित शेतकऱ्याच्या शरीरावर जखमा आढळून आल्याने या शेतकऱ्याची हत्या झाल्याची प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. प्रदीप टेंभुर्णे (45) असे मयत शेतकऱ्याचे नाव आहे. याप्रकरणी अड्याळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**शरीरावरील जखमांमुळे हत्या झाल्याचा अंदाज**

मयत प्रदीप टेंभुर्णे हे नेहमीप्रमाणे गावालगत असलेल्या आपल्या शेतात राखणीला रात्री गेले होते. मात्र सकाळी उशिर होऊनसुद्धा घरी परत न आल्यामुळे मुलाने शेतात जाऊन पाहिले असता प्रदीप यांचा रक्तबंबाळ अवस्थेत मृतदेह आढळला. याची माहिती



तात्काळ अड्याळ पोलिसांना देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच अड्याळ पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा सुरू केला. शरीरावरील जखमांमुळे प्रदीपची हत्या झाल्याचा पोलिसांनी प्राथमिक अंदाज वर्तविला असून अड्याळ पोलिस त्या दृष्टीने तपास करीत आहेत. मृतक शेतकऱ्याचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी भंडारा येथील सामान्य रुग्णालयात पाठवण्यात आला. प्रदीप यांच्या या दुर्दैवी मृत्यूमुळे कलेवाडा गावात शोककळा पसरली आहे.

**अन्य एका घटनेत मित्रांकडून मित्राची हत्या**

क्षुल्लक कारणावरून 4 मित्रांनी मिळून तलवारीने वार करून एका मित्राची हत्या केल्याची धक्कादायक घटना भंडारा शहरात उघडकीस आली आहे. हत्या केल्यानंतर पुरावे मिटविण्यासाठी आरोपींनी मृतदेह वैनगंगा नदीत फेकून दिला होता. ह्या प्रकरणी भंडारा शहर पोलिसांनी चार आरोपींना अटक केली आहे. महेंद्र उर्फ टिंकू दहिवले (36) असे मयत तरुणाचे नाव आहे. शुभम नंदूरकर (21), निशांत कटकवार (19), दीपांशु शहारे (20), हेमंत पांडे अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

## पोलीस उपायुक्त खंडणीप्रकरणी एकास अटक

मुंबई : खंडणीचे आरोप असलेले पोलीस उपायुक्त सौरभ त्रिपाठी यांनी अंगडिया व्यापाऱ्यांकडून घेतलेली रक्कम हवालाद्वारे स्वीकारल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. याप्रकरणी गुन्हे शाखेची पाच पथके उत्तर प्रदेशात गेली होती. त्यांनी तेथून त्रिपाठी यांच्या नोकराला अटक केली. आरोपीने हवाला रक्कम उत्तर प्रदेशात स्वीकारल्याचा आरोप आहे.



गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी उत्तर प्रदेश पोलिसांच्या मदतीने लखनऊ येथे पप्पूकुमार प्यारेलाल गौड (२७) याला अटक केली आहे. गौड हा उपायुक्त त्रिपाठी यांचा नोकर असून त्याने त्रिपाठीच्या सूचनेवरून पोलीस निरीक्षक ओम वंगाटे यांच्याकडून हवालाद्वारे पैसे स्वीकारले होते. न्यायालयाने गौडला २८ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. याप्रकरणी वंगाटे याला १० मार्च रोजी अटक करण्यात आली होती. त्याने अंगडिया व्यापाऱ्यांकडून सुमारे १९ लाख रुपये उकळल्याचा आरोप आहे. एका अधिकाऱ्याने सांगितले की, वंगाटेने या खंडणीची काही रक्कम तत्कालीन विभागीय उपायुक्त त्रिपाठी यांच्या सूचनेनुसार एका व्यक्तीला दिली. गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी या व्यक्तीचा शोध घेतला असून त्याच्याकडून दीड लाख रुपये जप्त केले आहेत. त्रिपाठी यांच्या सूचनेनुसार वंगाटे याने लखनऊमधील एका व्यक्तीला हवालाद्वारे पैसे पाठवले होते. या प्रकरणात पुरावा म्हणून गुन्हे गुप्तवार्ता कक्षाच्या अधिकाऱ्यांनी हवाला व्यवहाराशी संबंधित कागदपत्रे आणि चलनी नोटा जप्त केल्या आहेत.

## घरच्यांचा लग्नाला विरोध, प्रेमी युगुल नदीवरील रेल्वे पुलावर, हायव्होल्टेज ड्राम्याने मालगाडीचा खोळंबा

जयपूर : राजस्थानच्या चित्तोडगडमधील (Chittorgarh) निंबाहेडा येथे रविवारी प्रियकर-प्रेयसीचा हायव्होल्टेज ड्रामा पाहायला मिळाला. नदीवरील रेल्वे पुलावरुन उडी मारुन आत्महत्या करण्यासाठी (S u i c i d e Attempt) एक प्रेमी युगुल दाखल झालं होतं. मात्र आत्महत्या करण्यापूर्वीच तिथे उपस्थित असलेल्या लोकांनी या जोडप्याला वाचवलं. दोघांच्याही कुटुंबीयांनी लग्नाला नकार दिला होता. त्यामुळे निराश झालेले प्रियकर-प्रेयसी रेल्वे रुळावर जीव देण्यासाठी उभे राहिले होते. सुमारे दीड तास चाललेल्या या नाट्यामुळे एक मालगाडी थांबून राहिली.

काय आहे प्रकरण?

कल्याणपुरा गावातील रहिवासी असलेला करण आणि नीमच रोड येथे राहणारी 16 वर्षीय अल्पवयीन मुलगी हे दोघे गेल्या दीड वर्षांपासून रिलेशनशीपमध्ये होते. दोघांनाही लग्न करायचे होते, पण घरच्यांनी नकार दिला. याचा राग येऊन दोघेही रविवारी दुपारी तीन वाजताच्या सुमारास कदममाळी नदीवरील रेल्वे पुलावर गेले.

तिथून ते नदीत उडी मारणार होते. यावेळी काही ओळखीच्या लोकांनी दोघांना पाहिले. त्यांनी मुलीच्या कुटुंबीयांना सांगितलं. कुटुंबीयांनी फोन केला असता मुलीने आत्महत्या करत असल्याचं सांगितलं.

लग्नाला होकार दिल्यास दोघंही आपला निर्णय बदलू, असंही तिने कुटुंबीयांना सांगितले. याच वेळी कोणीतरी पोलिसांना या प्रकरणाची माहिती दिली, त्यानंतर पोलीस घटनास्थळी पोहोचले. काही वेळातच तिथे गर्दी जमा झाली.पोलिसांनी दोघांना रेल्वे ट्रॅकवरुन हटवलं

दोघांना वाचवण्यासाठी गावातील काही जणांनी नदीत उड्या मारल्या होत्या. काही तरुण घटनास्थळी पोहोचले आणि दोघांनाही रुळावरुन हटवले. करण आणि अल्पवयीन मुलगी पोलिसांना वारंवार धमकावत होते, की




जवळ आल्यास दोघेही नदीत उड्या मारतील. त्यांना ट्रॅकवरुन हटवल्यानंतर कोतवाली पोलिसांनी त्यांना पोलिस ठाण्यात आणले आणि शांतता भंग केल्याप्रकरणी करणला अटक केली. अल्पवयीन मुलीला बालकल्याण समितीच्या ताब्यात देण्यात आले. सुमारे दीड तासानंतर दोघांना रुळावरून हटवल्यानंतर मालगाडी रवाना होऊ शकली. दीड वर्षांपासून रिलेशनशीपमध्ये करण निंबाहेडा येथील शाळेत शिकतो. तर मुलगी जवळपासच्या एका शाळेत जाते. शाळेत जात असताना मुलीची करणशी भेट झाली होती. दोघे एकमेकांच्या प्रेमात पडले. तीन-चार महिन्यांपूर्वी दोघेही सोबत पळून गेले होते. पोलिसांनी त्यांना पकडून आणले. तेव्हापासून दोन्ही कुटुंबीय दोन्ही मुलांना समजावण्याचा प्रयत्न करत होते. दोघांचे समाज वेगवेगळे असल्यामुळे कुटुंबीय लग्नाला राजी होत नसल्याची माहिती आहे.

## मानोली धरणाजवळ पत्र्याची पेटी, उघडून पाहिल्यावर तिशीतील महिलेचा मृतदेह



कोल्हापूर : पत्र्याच्या पेटीत अज्ञात महिलेचा मृतदेह (Dead B o d y ) आढळल्याने कोल्हापुरात (K o l h a p u r) एकच खळबळ उडाली आहे. मानोली लघु पाटबंधारे जलाशयाच्या परिसरात हा प्रकार उघडकीस आला आहे. शाहूवाडी पोलिस ठाण्यात अज्ञाताविरुद्ध खून आणि खुनाचा पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सात ते आठ दिवसांपूर्वी गळा आवळून महिलेची हत्या (Murder) केल्याचा पोलिसांना संशय आहे. संबंधित महिला 30 ते 32 वर्ष वयोगटातील असल्याचा अंदाज आहे.

कोल्हापुरात पत्र्याच्या पेटीत अज्ञात महिलेचा मृतदेह आढळल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पर्यटनासाठी प्रसिद्ध आंबा या मुख्य गावापासून अवघ्या दीड किलोमीटर अंतरावर असलेल्या मानोली लघु पाटबंधारे जलाशयाच्या परिसरात हा प्रकार घडला.महिलेचा मृतदेह पत्र्याच्या पेटीतपुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने संशयितांनी महिलेचा मृतदेह पत्र्याच्या पेटीत घालून टाकला.

## मुलीचा मृत्यू अपघाती नाही तर घातपात

चंद्रपूर : प्रियकराची भेट घेण्यासाठी चोराळा शिवारात गेलेल्या एका युवतीचा अपघाती मृत्यू झाला. पडोली पोलिसांनी सखोल चौकशी न करता प्रियकर अभिषेक देशभ्रतार याने दिलेल्या माहितीनुसार अपघाताचा गुन्हा नोंद केला. दरम्यान, मृत मुलीच्या कुटुंबीयांनी तिच्यावर सामूहिक अत्याचार करून हत्या केल्याचा संशय व्यक्त केला आहे. तेव्हा या प्रकरणाची चौकशी सीबीआय किंवा उपविभागीय पोलीस अधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांकडून करावी, अशी मागणी मृत




मुलीचा भाऊ नितेश मेहता व युवा स्वाभिमान पार्टीचे जिल्हाध्यक्ष सूरज ठाकरे यांनी केली आहे.चोराळा शिवारात १६ मार्चला दुपारच्या सुमारास शीतलचा घातपात करून नियोजित पद्धतीने तिचा प्रियकर व त्याच्या साथीदारांकडून खून करण्यात आला आहे. या प्रकरणात पडोली पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. जिल्हा सामान्य रुग्णालयात तिच्या कुटुंबीयांनी पाहिलेल्या स्थितीवरून सामूहिक अत्याचार केल्याचे स्पष्ट दिसून येते. पोलिसांकडून अपघात दाखवला जात असला तरी शीतलच्या दुचाकीला किंवा शरीराला कुठेही जखमा नाही. केवळ गुप्तांगाला इजा झाली असल्याने तिचा प्रियकर व साथीदारांनी शीतलवर सामूहिक अत्याचार करून खून केल्याचा आरोप निलेश आणि सूरज ठाकरे यांनी केला आहे. शीतलची मैत्रीण या प्रकरणात मुख्य साक्षीदार असताना तिचे अद्यापही बयाण घेण्यात आलेले नाही. पडोली पोलिसांकडून कोणत्याही शंकेचे निराकरण केले जात नाही. सदर घटना १६ मार्चला घडली असताना १७ मार्चला दुपारी १२ वाजेपर्यंत शवविच्छेदन करण्यात आले नव्हते. अशा प्रकरणात पॅनेलमध्ये शवविच्छेदन करण्यात आलेले नाही. शीतलच्या मृत्यूप्रकरणात पोलिसांनी प्रियकराच्या सांगण्यावर विश्वास ठेवून अपघाताची नोंद केली आहे. घटनेच्या वेळी प्रियकरासोबत आणखी चार साथीदार होते. त्यांचीही चौकशी करण्यात आली नाही.

## नातेवाईकांची बदनामी, बार मालकाचा माजी नगरसेवकावर खुनी हल्ला, दोघे गंभीर



सांगली : बार मालकाने माजी नगरसेवकावर खुनी हल्ला (Attack) केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सांगली (S a n g l i) जिल्ह्यातील आष्टा तालुक्यात ही घटना घडली आहे. हल्ला प्रकरणी आठ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तर चौघांना अटक झाली आहे. नातेवाईकांची बदनामी करण्याच्या कारणावरुन हा राडा झाला होता. बार मालकाच्या टोळीने लोखंडी गज काठ्यांनी केलेल्या हाणामारीत माजी नगरसेवक संदीप तांबवेकर आणि त्यांचे बंधू प्रदीप तांबवेकर हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत.सांगली जिल्ह्यातील आष्टा तालुक्यात बार मालकाने माजी नगरसेवकावर जीवघेणा हल्ला केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी आठ जणांच्या विरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे, तर चौघांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.लोखंडी गज-काठ्यांनी मारहाणनातेवाईकांची बदनामी केल्याच्या रागातून दोन गटांमध्ये हाणामारी झाल्याचा आरोप आहे. बार मालकाच्या टोळीने लोखंडी गज-काठ्यांनी मारहाण केली.

## पतीच्या जाचाला कंटाळून महिलेची विहिरीमध्ये उडी घेऊन आत्महत्या

भंडारा : पतीच्या जाचा (Harassing)ला कंटाळून विवाहित महिलेने विहिरीमध्ये उडी घेऊन आत्महत्या (Suicide) केल्याची घटना भंडारा जिल्ह्याच्या तुमसर तालुक्यातील मोहाडी पोलिस स्टेशन हद्दीतील पांजरा येथे घडली आहे. दुर्गा मुकेश टांगले (35) असे मयत विवाहितेचे नाव आहे. याप्रकरणी स्थानिक पोलिस ठाण्यात घटनेची नोंद करण्यात आली आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मृतदेह विहिरीत बाहेर काढला.



पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला. पतीच्या मारहाणीला कंटाळून पत्नीची आत्महत्या

मयत महिला तुमसर तालुक्यातील पांजरा येथील रहिवासी आहे. मयत महिला दुर्गाच्या पतीला दारुचे व्यसन होते. दारुच्या नशेत दररोज दुर्गाचा पती तिला मारहाण करीत असे. मयत महिला शुक्रवारी कामाला जात आहे असे सांगून घरातून निघून गेली. मात्र ती सायंकाळपर्यंत घरी परतलीच नाही. त्यामुळे घरच्यांनी इकडे तिकडे शोधाशोध घेत केली. परंतु कुठेच तिचा थांगपत्ता लागला नाही. दोन दिवसांनी रविवारी दुपारच्या सुमारास पांजरा येथील मेश्राम नामक यांच्या विहिरीमध्ये तिचा मृतदेह तरंगत असताना गावकऱ्यांना दिसला. विहिरीमध्ये मृतदेह असल्याची वार्ता गावात पसरताच गावकऱ्यांनी विहिरीकडे धाव घेतली. या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी महिलेचे शव विहिरीबाहेर काढत उत्तरोत्तर तपासणी तुमसर रुग्णालयात पाठविले आहे. दुर्गाच्या दुखद मृत्यूने गावात शोककळा पसरली आहे.

यवतमाळमध्ये शेतकऱ्याची आत्महत्या

नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून यवतमाळमध्ये एका शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. प्रकाश मानकर असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. मानकर यांनी सेंट्रल बँक ऑफ इंडियाकडून कर्ज घेतले होते. मात्र सततच्या नापिकीमुळे शेतीच न आल्यामुळे त्यांना कर्ज फेडता येत नव्हते. त्यामुळे कर्जाचा डोंगर वाढतच चालला होता. यामुळे आर्थिक विवंचनेत असलेल्या मानकर यांनी भावाच्या शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली.

## पिंपरीत रंग लावण्याचा बहाण्याने सराईत गुन्हेगाराने मायलेकीचा केला विनयभंग

राज्यभरात होळी आणि धुळवड मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. दोन वर्षानंतर हे उत्सव साजरे करण्याची संधी नागरिकांना मिळाली. मात्र याला गालबोट लागल्याची घटना चिंचवडमध्ये घडली आहे. एका सराईत गुन्हेगारांने रंग लावण्याचा बहाण्याने माय लेकीचा विनयभंग केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी वैभव माने याला पिंपरी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. आरोपीने चिंचवडच्या रामनगर परिसरात हातात कोयता घेऊन दहशत पसरविली होती. या प्रकरणी पीडित महिलेने पिंपरी पोलिसात तक्रार दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित अल्पवयीन मुलगी आणि तिची आई हे



घराच्या समोरील ओट्यावर रंग खेळत होत्या. बेसावध असलेल्या दोघींना पाहून आरोपीने अगोदर आईला मिठी मारून रंग लावण्याचा प्रयत्न केला. हे पाहून अल्पवयीन मुलगी घाबरून घरात पळून गेली. परंतु, आरोपी घरात शिरला आणि तिचाही विनयभंग केला असे तक्रारीत म्हटल आहे.

दरम्यान, पीडित तक्रारदार महिलेच्या पतीने आरोपी वैभवला अडवण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याला शिवीगाळ आणि जीवे मारण्याची धमकी दिली गेली.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत).संपर्क:-9594418181 / 8424989898